सकाळ कोल्हापूर, मंगळवार, ३ सप्टेंबर २०२४



गडहिंग्लज : रवळनाथ सुविधा केंद्राच्या वर्धापनदिनी डॉ. नागेश पट्टणशेट्टी व डॉ. राजश्री पट्टणशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. यावेळी व्ही. के. मायदेव, डॉ. संजय चौगुले, डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

# 'रवळनाथ'ने सामान्यांना अर्थ साक्षर केले : डॉ. पट्टणशेट्टी

गडहिंग्लज, ता. २ : 'समाजात अनेक आर्थिक संस्था निर्माण झाल्या आहेत. त्यांच्याकडून दाखवल्या जाणाऱ्या आकर्षणाला भुलून लोक आर्थिक बळी पडताहेत. अशा सामान्यांच्या कष्टाचा पैसा योग्य ठिकाणी गुंतवला पाहिजे. यासाठी रवळनाथ संस्था नेहमीच मार्गदर्शन करीत असल्याने सर्वसामान्य आर्थिक साक्षर बनत आहेत,' असे गौरवोद्‌गार डॉ. नागेश पट्टणशेट्टी यांनी काढले.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या शाखा सुविधा केंद्राचा ५ वा वर्धापन दिन उत्साहात झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव होते. डॉ. सौ. राजश्री पट्टणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सौ. पट्टणशेट्टी यांनी तज्ज्ञ संचालक, कुशल कर्मचारी आणि संस्थेची सामाजिक बांधिलकीमुळे रवळनाथ संस्थेचा नावलौकिक झाल्याचे सांगितले. प्रा. मायदेव म्हणाले, 'संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांचे कुशल नेतृत्व आणि सर्व संचालक, कर्मचाऱ्यांच्या एकजुटीच्या प्रयत्नामुळे संस्थेच्या सर्व शाखा यशस्वी वाटचाल करीत आहेत.' कुडाळ शाखेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीकांत सावंत यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संचालिका मीना रिंगणे यांनी स्वागत केले. संपदा घुगरे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी आभार मानले. यावेळी प्रा. विजय घुगरे, प्रा. विजय आरबोळे, डॉ. संजय चौगुले, महेश मजती, डॉ. दत्ता पाटील, उमा तोरगल्ली, संदीप कागवाडे, सीईओ डी. के. मायदेव, डॉ. बसवेश्वर चौगुले, बसवराज चौगुले उपस्थित होते.